# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे

फोन.नं. ०२२-२९४५१००१

Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र ९०** **दिनांक- ०९/०४/२०२१**

**अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखा वसई व भाईंदर यांची ऑनलाईन वेशाव्यवसाय करणाऱ्या दलालांवर विविध ठिकाणी केली छापेमारी.छापेमारीत ऑनलाईन टिंडर डेटींग ॲपचे माध्यमातून नोकरीचे आमिष दाखवून मुलींना जबरदस्तीने वेशाव्यवसायात ढकलणाऱ्या तसेच एस्कॉर्ट सर्व्हिसेसच्या माध्यमातुन चालणा-या वेश्या व्यवसायावर कारवाई करून एकुण पाच पिडीत मुलींची सुटका करून दोन पुरुष दलाल व एक महीला दलाल साथीदार यांच्या आवळल्या मुसक्या.**

१) दिनांक ०८/०४/२०२१ रोजी माणिकपुर पोलीस ठाण्याचे हद्दीत रिषीकेश हॉटेल जवळ माणिकपुर, वसई पश्चिम येथे एक महीला वेश्यादलाल वेश्यागमननाकरीता मुली घेवुन येणार असल्याची गोपनीय माहीती मिळाली. त्यावरूनवरुन वरीष्ठ पोलीस निरीक्षक भास्कर पुकळे यांनी स्टाफसह यांनी जावुन छापा टाकला त्यामध्ये एक महीला दलाल आरोपी वय २१ वर्षे हीस ताब्यात घेतले व चार पिडीत मुलींची वेश्याव्यवसायापासुन सुटका केली.

सदर महीला आरोपीकडे अधिक चौकशी करता मुख्य पुरुष दलाल नामे सुरज ऊर्फ संदीप नंदकुमार पाल.वय २६ वर्षे याचे सदर गुन्हयात सहभागाविषयी सांगितले त्यावरुन सदर सुरज ऊर्फ संदीप नंदकुमार पाल यास सापळा लावुन ताब्यात घेण्यात आले.

सदरबाबत हकीकत अशी की,यातील पिडीत मुली /महीला यांनी नोकरीकरीता ओएलएक्स या ॲपवर आपला बायोडेटा /रिझ्युम पाठविला होता. सदर रिझ्युम मधील फोन नंबर,फोटो इत्यादी माहीती घेवुन यातील आरोपी (सुरज ऊर्फ संदीप नंदकुमार पाल) सदर मुलींना फोनद्वारे व वॉटसॲप द्वारे संपर्क करीत असे व त्यांना फिल्ड मार्केटींग जॉब असलेबाबत सांगत असे व कस्टमरचे नंबर व पत्ता पाठवितो व तिकडेच जावुन तुम्हाला सर्व्हीस दयायची आहे असे सांगत असे. ज्या मुली /महीला त्याच्या गळाला लागत असत त्यांच्याकडुन सदर आरोपी व त्याची महीला साथीदार टिंडर ॲपच्या माध्यमातुन गिऱ्हाईक बोलावुन कमिशनच्या बदल्यात वेश्या व्यवसाय करुन घेत असत व ज्या मुली /महीला सदर आरोपीस वॉटसॲपवर ब्लॉक करुन प्रतिसाद देत नसे त्यांना सदर पुरुष आरोपी हा त्यांच्या रिझ्युममधील फोटो एडीट (अश्लिल फोटो तयार) करुन ते समाजामाध्यमावर टाकण्याची धमकी देवुन ब्लॅकमेल करीत असे. व टिंडर डेटींग ॲपमध्ये उपरोक्त आरोपीने त्याचे महीला साथीदाराचा फेक आयडी , फोटो टाकला होता. व त्या माध्यमातुन गिऱ्हाईक मिळवुन उपरोक्त पिडीत मुलींना कमिशनच्या बदल्यात वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडत असे.सदरप्रकरणी माणिकपूर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I १४७/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०(१), ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५,७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

२)अशाच प्रकारे दि.०८/०४/२०२१ रोजी काशिमीरा पोलीस ठाणेचे हद्दीत वेश्यादलाल हे ऑनलाईन वेशाव्यवसायाचे रॅकेट चालवून एस्कॉर्ट सर्व्हिसेसच्या माध्यमातुन पैशाचे मोबदल्यात ग्राहकांना मुली पुरवितात अशी माहिती वरिष्ठांना मिळाली होती. त्या अनुषंगाने गोपनीय माहिती मिळवून कारवाई करण्याच्या सुचना वरिष्ठांनी दिलेल्या होत्या. गोपनीय माहिती घेत असतांना गुप्त बातमीदाराकडून House wife in Mira Road (Mumbai)-See all offers on Locanto.... https://m.in.locan. to>geo>Mira-R...या एस्कॉर्ट सेवेच्या माध्यमातुन इसम नामे पवन उर्फ राणीकुमारी रा. अंधेरी व त्याचा साथीदार अनिल साहू रा. मिरारोड हा मुलींना वेश्याव्यवसायाकरीता प्रवृत्त करुन पुरुष ग्राहकाकडून पैशाचा मोबदला घेवून वेश्यागमनाकरीता मुली पुरवितात

दि.०८/०४/२०२१ रोजी पवन याचा साथीदार अनिल साहू हा मंगलनलगर, मिरारोड पूर्व येथील भाजी मार्केट या ठिकाणी पुरुष ग्राहकास मुली पुरविणार आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.एस.एस.पाटील यांनी मंगलनगर येथील भाजी मार्केट या ठिकाणी पोलीस पथकासह छापा टाकला असता वेश्या दलाल अनिल उर्फ सुनिल साहू वय २६ वर्ष रा. बी/१०५, रामगोपाल बिल्डीग, कॅबीन रोड, भाईन्दर पूर्व. ता.जिल्हा ठाणे. मुळ रा. गाव- कादे, पोलीस ठाणे राजपूर, जिल्हा चतरा, राज्य झारखंड. हा वेश्यागमनाचे मोबदल्यात पैसे स्विकारुन पुरुष ग्राहाकांना मुली पुरवित असल्याचे निष्पन्न झाल्याने वेश्यागमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०१ पिडीत महिलेची सुटका करण्यात आली. सदर बाबत पो.हवा./२२६९ उमेश पाटील यांचे फिर्यादीवरुन आरोपी विरुध्द काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I २८८/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०(१),३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**आरोपी अनिल उर्फ सुनिल साहू** वय २६ वर्ष रा. बी/१०५, रामगोपाल बिल्डीग, कॅबीन रोड, भाईन्दर पूर्व. ता.जिल्हा ठाणे. मुळ रा. गाव- कादे, पोलीस ठाणे राजपूर, जिल्हा चतरा, राज्य झारखंड. हा **अभिलेखावरील गुन्हेगार असून त्याचे विरुध्द यापुर्वी भाईन्दर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र.४७३/२०१७ भा.द.वि.सं. कलम ३७० (१) ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.**

सदरच्या दोन्ही कारवाई या श्री .डॉ महेश पाटील मा. पोलीस उपायुक्त (गुन्हे) व श्री. रामचंद्र देशमुख सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा, वसई युनिटचे पोनि/भास्कर पुकळे तसेच भाईंदर युनिटचे पोनि/ संपतराव पाटील व स्टाफ यांनी केली आहे.

Scanned with CamScanner